वाचले-

१) बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांचेकडील पत्र क्र.बीपी/०१/कावि/५४५/२०२४, दिनांक २९/०५/२०२४
२) आदेश क्र.प्रशा/०२/८७/२०२२, दिनांक ०१/०२/२०२२
३) मा.आयुक्त सो यांचेकडील दिनांक ३१/०५ /२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१/कावि/२०४ /२०२४
दिनांक ०७/०६/२०२४

**<u>विषय</u> :- अतिरिक्त कामकाज सोपविणेबाबत...**

आदेश,

उपरोक्त वाचले क्र. १ चे पत्रान्वये श्री. निकम मकरंद ज्ञानोबा,शहर अभियंता हे दिनांक ३१/०५/२०२४ ते दिनांक ०७/०६/२०२४ या कालावधीत रजेवर असलेबाबत कळविलेले आहे.प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने श्री. निकम मकरंद ज्ञानोबा,शहर अभियंता यांचेकडील बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे अतिरिक्त कामकाज ते कर्तव्यावर रुजू होईपर्यंत अन्य अधिकारी यांचेकडे सोपविणे आवश्यक आहे.

श्री. निकम मकरंद ज्ञानोबा,शहर अभियंता यांचे रजा कालावधीत त्यांचेकडील वरील प्रमाणे नमूद विभागाचे कामकाज श्री.जुंधारे ज्ञानदेव रामचंद्र,सह शहर अभियंता(स्थापत्य) यांचेकडे अतिरिक्त पदभाराचे कामकाज सोपविणेकामी मा.आयुक्त यांची उपरोक्त वाचले क्र.३ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

सबब मी उप आयुक्त,सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त वाचले क्र.०३ वरील मा.आयुक्त यांची मान्यता विचारात घेवून उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने **श्री.जुंधारे ज्ञानदेव रामचंद्र, सह शहर अभियंता(स्थापत्य)** यांचेकडे बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे अतिरिक्त पदभाराचे कामकाज श्री. निकम मकरंद ज्ञानोबा, शहर अभियंता हे कर्तव्यावर रुजू होईपर्यंत सोपविण्यास सदर आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

श्री.जुंधारे ज्ञानदेव रामचंद्र, सह शहर अभियंता(स्थापत्य) यांनी यापूर्वी सोपविलेले विभागाचे कामकाज सांभाळून वरीलप्रमाणे नमूद विभागांचे अतिरिक्त पदभाराचे कामकाज करावयाचे आहे. सदर अतिरिक्त कामकाजाचे अनुषंगाने प्रदान केलेले अधिकार वापरण्यास सदर आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी आदेशाचे दिनांकापासून करण्यात यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
**संबंधित अधिकारी**
प्रत-१) लेखा २) लेखापरीक्षण विभाग ३) संबंधित विभाग